-: प्रेस नोट :- दिनांक - ०३/१२/२०२४

**अंमली पदार्थ विरोधी कारवाईमध्ये मुंबई गुन्हे शाखेकडून ०१ गांजा तस्कर अटकेत.**

| | | |
|---|---|---|
| कक्ष | : | गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-४, अ‍ॅन्टॉपहिल, मुंबई |
| गु.र.क्र. व कलम | : | गु.प्र.शा., वि.स्था. गु.र.क्र. ८१/२०२४ कलम ८(क) सह २०(क) एन.डी.पी.एस. कायदा (आग्रीपाडा पोलीस ठाणे वि. स्था.गु.र.क्र. ६०२/२०२४) |
| गुन्हा घडला दिनांक | : | दिनांक - ०२/१२/२०२४ रोजीचे १६:०० वाजता |
| दाखल दिनांक | : | दिनांक - ०३/१२/२०२४ रोजीचे ००:२७ वाजता |
| गुन्हयाचे घटनास्थळ | : | विठठल निवास रूम नं. १७, बी ब्लॉक, तिसरा माळा,जेकब सर्कल, सातरस्ता , मुंबई नं. ११ |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | : | एकूण ३८ किलो ११७ ग्रॅम प्रतिबंधीत गांजा अंदाजे किमंत ९,५२,९२५/-रुपये |
| अटक आरेपी संख्या | : | ०१ |

दिनांक ०२/१२/२०२४ रोजी गु.प्र.शा., गु.अ.वि.,कक्ष-४, अ‍ॅन्टॉपहिल, मुंबई येथे नेमणूकीस असलेले पो.ह.५६९४/महाजन यांना विश्वसनिय माहिती प्राप्त झाली ‘‘एक इसम वय सुमारे २७ वर्षे रा.ठि. विठठल निवास रूम नं. १७, बी ब्लॉक, तिसरा माळा,जेकब सर्कल, सातरस्ता , मुंबई नं. ११ याने त्याचे घरामध्ये गांजा हा अंमली पदार्थाची साठवणूक करून तो त्याचे राहाते घरामध्ये गांजा या अंमली पदार्थाच्या छोटया छोटया पुडया बनवून तो त्याचे गिऱ्हाईकाना विक्री करतो. ’’

त्याप्रमाणे गु.प्र.शा., गु.अ.वि.,कक्ष-४, अ‍ॅन्टॉपहिल, मुंबईच्या पथकाने वर नमूद ठिकाणी सापळा कारवाई करुन एका इसमास एकूण ३८ किलो ११७ ग्रॅम प्रतिबंधीत गांजा अंदाजे किमंत ९,५२,९२५/-रुपये इतका साठा जप्त केला आहे. वर नमूद इसमा विरुध्द वरिल प्रमाणे गुन्हा नोंद करुन सदर गुन्हयामध्ये अटक करण्यात आली आहे.

गुन्हयातील अटक आरोपी हा गु.प्र.शा., गु.अ.वि.,कक्ष-४, अ‍ॅन्टॉपहिल, मुंबई पथकाच्या कौशल्यपुर्ण कारवाईमुळे तावडीत मिळून आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष-४, अ‍ॅन्टॉपहिल, मुंबई कक्षा मार्फत चालू असून अटक आरोपी हा दिनांक ०७/१२/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत आहे. आरोपीताकडे करण्यात आलेल्या तपासामध्ये आरोपीत इसम हा मागील एक वर्षा पासून गांजा या प्रतिबंधित अंमली पदार्थाची तस्करी करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची यशस्वी कारवाई मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त, (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शशी कुमार मिना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. दत्ता नलावडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी) पश्चिम. श्री. प्रशांत राजे गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष - ४ च्या प्रपोनि लता सुतार, पो.नि. नितीन कुंभार, स.पो.नि. शामसुंदर भिसे, स.फौ. संजय परब, पो.ह. किशोर महाजन, म.पो.ह. ज्योती शेटे, पो.शि. अनुपम जगताप, पो.शि. अनिल पवार, पो.शि. प्रभाकर वाघ, पो.शि.चा. किरण चावरेकर, पो.शि.चा. पोपट लाडबले यांनी केली आहे.

-----------------